# नाशिक औष्णिक विद्युत केंद्रातर्फे आयोजित आंतरविभागीय क्रिकेट स्पर्धेत, नाशिक निर्मिती प्रशिक्षण केंद्राला विजेते पद



मुख्य महाव्यवस्थापक नाशिक औ.वि.केंद्र श्री. शालिक खराबे यांचे शुभहस्ते विजयी चषक स्वीकारताना प्रशिक्षणार्थींचा चमू व श्री.एस.बी. भांदेकर

नाशिक औष्णिक विद्युत केंद्रातील 'उपकरणीकरण व नियंत्रण टप्पा क्र. २' विभागातर्फे आंतरविभागीय क्रिकेट स्पर्धा 'समन्वय चषक-२००९' दिनांक १७ ते २६ जानेवारी २००९ दरम्यान आयोजित केल्या होत्या. २६ जानेवारी २००९ या प्रजासत्ताक दिनी स्पर्धेतील अंतिम निर्णायक सामना टप्पा क्र. १ (संचलन व सुव्यवस्था) व नाशिक निर्मिती प्रशिक्षण केंद्र यांच्यामध्ये खेळला गेला. हा सामना या प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण घेत असलेल्या प्रशिक्षणार्थींनी उत्कृष्ट क्षेत्ररक्षण व फलंदाजी करून सामना जिंकला व स्पर्धेतील ''समन्वय चषक-२००९'' हे पारितोषिक सलग तिसऱ्या वर्षीही नाशिक निर्मिती प्रशिक्षण केंद्राकडे राखुन ठेवण्याचा बहुमान मिळविला.

तसेच सामन्यातील उत्कृष्ट फलंदाज हे पारितोषिक श्री.भुषण झोपे क.अभि. (प्रशिक्षणार्थी) व सामनावीर हे पारितोषिक श्री.एम.एम. पाटील क.अभि. (प्रशिक्षणार्थी) यांनी पटकावले आणि उत्कृष्ट गोलंदाजीचे प्रदर्शन श्री.हर्षद संखे क.अभि. (प्रशिक्षणार्थी) यांनी केले. या स्पर्धेसाठी नाशिक निर्मिती प्रशिक्षण केंद्रातर्फे कर्णधाराची धुरा श्री.कुंदन राठोड, क.अभि. (प्रशिक्षणार्थी) यांनी सांभाळली व श्री.एस.आर. शिंदे उपकार्यकारी अभियंता (नि.प्र.) यांनी क्रिकेट संघ व्यवस्थापक म्हणून काम पाहिले.

नाशिक निर्मिती प्रशिक्षण केंद्रातर्फे प्रशिक्षणार्थींना, क्रिकेट व व्हॉलीबॉलचे साहित्य उपलब्ध करून दिलेले असुन. प्रशिक्षणा बरोबरच प्रशिक्षणार्थींचा सर्वांगीण विकासाकडे विशेष लक्ष पुरविले जाते.

श्री.एस.बी. भांदेकर अधीक्षक अभियंता (नि.प्र.) व इतर अधिकारवृंदानी सर्व खेळाडुचे कौतुक व अभिनंदन केले.

## महत्वाचे कार्यालयीन आदेश, सुधारपत्र व परिपत्रक

| अ.क्र. | विषय | संदर्भ |
|---|---|---|
| १. | महानिर्मिती कंपनीतील वेतनगट ३ व ४ मधील कर्मचारी वर्गाला द्यावयाचे काळे चामडी बुटाचे दरबाबत. | परिपत्रक क्र. महानिर्मिती/आ.अ. (मासं-२)/रवका/७९२ दि. १७.०१.०९. |
| २. | कारागीर 'क' पदावरील कर्मचाऱ्यांना द्यावयाच्या वाहन भत्याच्या दराबाबत. | पत्र क्र. महानिर्मिती/आ.अ. (मासं-२)/१३८४ दिनांक ३१.०१.२००९. |

# नाशिक निर्मिती प्रशिक्षण केंद्र येथे ''ॲटिटयुडिनल चेंज'' या विषयावर एक दिवसीय चर्चासत्र



चर्चासत्राचे उदघाटन करताना मुख्यालयातील श्री.नंदकिशोर गटणे (मुख्य महाव्यवस्थापक-नियामक कक्ष)

महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मधील कर्मचारी व अभियंत्यांना कार्पोरेट कल्चर मधील कार्यप्रणाली स्वीकारतांना अपेक्षित असलेल्या बदलाची इत्तंभुत माहिती देण्याकरिता नाशिक निर्मिती प्रशिक्षण येथे''ॲटिटयुडिनल चेंज'' या विषयावर कारागिर व अभियंत्यांसाठी एक दिवसीय चर्चासत्र दिनांक २४.०१.२००९ ला आयोजित केले होते.

या चर्चासत्राचे उद्घाटन मा.श्री.एस.जे. जाधव मुख्य महाव्यवस्थापक (कार्य.), मा.श्री.एन.पी. गटणे, मुख्य महाव्यवस्थापक (आर.सी.), मुंबई मुख्यालय, यांच्या शुभहस्ते व डॉ.एम.बी. भगत वैद्यकीय अधीक्षक एन.टी.पी.एस. एकलहरे यांच्या प्रमुख उपस्थितीत दीप प्रज्वलन व सरस्वती पुजन करून करण्यात आले.

या उद्घाटन प्रसंगी मा.श्री.जाधव, मुख्य महाव्यवस्थापक (कार्य.) यांनी मनुष्यबळा विषयी महत्त्वाचे मुद्दे उदाहरण अहंकार, प्रामाणिकपणा, मानवी संबंध इत्यादी संबंधी सोदाहरण सांगुन या कार्यशाळेचे महत्त्व विशद केले. श्री.गटणे मुख्य महाव्यवस्थापक (आर.सी) यांनी या प्रसंगी यथोचित मार्गदर्शन केले. व कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या. तसेच नाशिक प्रशिक्षण केंद्र अशा प्रकारच्या कार्यशाळा आयोजित करीत असल्याबद्दल आनंद व्यक्त केला व येथील अधिकाऱ्यांचे कौतुक केले.

या चर्चासत्रात व्यक्तिमत्व विकास, वेळेचे नियोजन, संभाषण कौशल्य, सकारात्मक दृष्टिकोण, त्याचे फायदे व ॲटिटयुडिनल चेंज या बद्दल सखोल माहिती श्री.एस.बी. भांदेकर, अधीक्षक अभियंता (प्र.) नाशिक निर्मिती प्रशिक्षण केंद्र यांनी दिली. या चर्चासत्रात नाशिक, परळी, भुसावळ, पारस व उरण येथील एकूण ४२ कारागिर व अभियंत्यांनी सहभाग नोंदविला.

आपल्या स्वभावामध्ये सकारात्मक दृष्टिकोन ठेवुन वेळेचे यथायोग्य नियोजन केल्याने आपला आत्मविश्वास तर वाढतोच त्याचप्रमाणे कंपनीचे उत्पादन वाढण्यास मदत होते, असे मत समारोप प्रसंगी श्री.एस.बी. भांदेकर, अधीक्षक अभियंता (प्र.) यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमाचा समारोप श्री.पी.एम. चौधरी महाव्यवस्थापक (टप्पा क्र. २) व डॉ.एम.बी. भगत वैद्यकीय अधीक्षक नाशिक औष्णिक विद्युत केंद्र एकलहरे यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

हे चर्चासत्र अतिउत्तम झाले, त्याचा फायदा दैनंदिन कामामध्ये कंपनीच्या उत्कर्षासाठी निश्चितच होईल, चर्चासत्राचा कालावधी वाढवावा, तसेच कंपनीतील सर्व कर्मचारी व अभियंत्यांकरिता अशा सत्राचे आयोजन करावे, अशा विनंतीवजा सुचना उपस्थित असलेल्या कारागिर व अभियंत्यांनी त्यांच्या लेखी अभिप्रायातुन व मनोदयातुन व्यक्त केल्या. हे चर्चासत्र यशस्वी करण्यास श्री.के.एन. माथुरकर, कार्यकारी अभियंता (नि.) व श्री.जे.एम. इब्राहीम, कार्यकारी अभियंता (नि.) यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री.अजय नेटके सहाय्यक अभियंता यांनी केले.